# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची आवड निर्माण करण्याबाबत**

**(१) १७८६ (०९-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी आवड निर्माण व्हावी यासाठी मराठी भाषा आणि वाङ्.मय यांच्या अभ्यासाला प्रोत्साहन देण्याकरिता महाराष्ट्र साहित्य परिषदेमार्फत गेल्या ८० वर्षापासून प्रथमा, प्रवेश, साहित्य प्राज्ञ आणि साहित्य विशारद या परिक्षा घेतल्या जातात त्याच धर्तीवर इंग्रजी माध्यमांच्या विद्यार्थ्यांसाठीही या परिक्षा घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये राज्य शासनाच्या मंडळाशिवाय अन्य मंडळांच्या शाळांकरिता या परिक्षा घेण्यात येणार आहेत काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(२) २३१६ (०८-०४-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक मान्यताप्राप्त अनुदानित शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा लाभ देण्यासाठी शासनाने आश्वासित प्रगती योजना लागू केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत २४ वर्षाच्या सेवेनंतर मिळणारा दुसरा लाभ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अद्यापपर्यंत मिळाला नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणतेही आदेश न दिल्याने मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने नियमानुसार मिळणारा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याचे आदेश पारित केले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाविरूध्द पुर्नविलोकन याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हाफकिन महामंडळातील कर्मचारी वसाहतीतील इमारत व रस्ते दुरुस्तीबाबत**

**(३) २४४९ (०६-०४-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील परळ भागात असलेल्या हाफकिन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वसाहतीमधील इमारतींची दुरुस्ती व वसाहतीमधील रस्ते दुरुस्तीकरीता शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी मागील ४ वर्षापासून शासनाकडे करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हाफकिन संस्था आवारातील १४ निवासी/अनिवासी इमारतींच्या दुरुस्तीच्या रु.३५,६२,८६,०५२/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय दिनांक ०७.०३.२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेनुसार कामकाज सुरु करण्यात आले असून कामकाज प्रगतीपथावर आहे. सदर बांधकामाच्या अनुषंगाने आजपर्यंत एकूण रु. २७,४६,१८,६००/- इतका निधी खर्च झाला आहे. तसेच संस्था आवारातील अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम करण्याकरीता रु.२.६२ कोटी इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०७.२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक शिक्षकांना निवड वेतनश्रेणीचा लाभ मिळण्याबाबत**

**(४) २७९७ (०८-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक १ जानेवारी, १९८६ व त्यानंतर सलग २४ वर्ष सेवा झालेल्या प्राथमिक शिक्षकांना निवड वेतन श्रेणीचा लाभ मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका यांना दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत क्षेत्रिय स्तरावर आवश्यक कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर.टी.ई. कायद्याअंतर्गत विद्यार्थ्यांस मिळणा-या सुविधांबाबत**

**(५) ३६७७ (०८-०४-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क नियम, २०११ दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ च्या भाग-३ मधील परिच्छेद क्र. ५ अन्वये आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश घेणा-या २५ टक्के विद्यार्थ्यांस शाळेमार्फत पाठ्यपुस्तके, गणवेश, शैक्षणिक साहित्य मिळणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण किती शाळेमार्फत सदरहू योजनेचा लाभ मिळत आहे,

(३) असल्यास, अद्याप ब-याच शाळेमधून आरटीई अंतर्गत २५ टक्के मध्ये प्रवेश घेतलेल्यास विद्यार्थ्यांना अनेक शाळा गणवेश, पाठ्यपुस्तंके, शैक्षणिक साहित्य मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार उक्त शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) आरटीई कायदा व त्यातील नियमानुसार २५ टक्के आरटीई राखीव जागांवरील प्रवेशित वंचित व दुर्बल घटकातील बालकांना इयत्ता ८ वी पर्यंत मोफत शिक्षण देण्याची तरतूद आहे व त्याप्रमाणे राज्यात आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असते. तथापि, काही शाळांबाबत पालकांकडून फीस बद्दल किंवा इतर सुविधांबद्दल तक्रारी प्राप्त होत असतात. प्रकरणपरत्वे क्षेत्रिय स्तरावर सदर तक्रारींचा निपटारा करण्यात येत असतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या विधी शाखेच्या एलएल.एम परिक्षेत विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याबाबत

**(६) ३७२८ (०७-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करती ल काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेतलेल्या विधी शाखेच्या पदव्यूत्तर (एलएलएम) परीक्षेत अनेक विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिका पूर्ण न तपासताच निकाल जाहीर केल्यामुळे मोठया संख्येने विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याचे दिनांक २५ ड सेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदव्युत्तर परीक्षेस एकूण किती विद्यार्थी बसले होते, त्यापैकी किती विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले व किती विद्यार्थ्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज केला असता त्याचा निकाल माहे जुलै, २०१९ मध्ये लागुनही निकालात बदल न झाल्याने विद्यार्थ्यांनी मागणी केलेल्या उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतिद्वारे सदर गैरप्रकार उघडकीस आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठ व्यवस्थापनाच्या निष्काळजी व गैर कारभारामुळे विद्यार्थ्यांचे झालेले प्रचंड शैक्षणिक नुकसान विचारात घेता, शासनाने उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शासनाने विद्यापीठाची प्रतिष्ठा कायम राहून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता, कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) एल.एल.एम. द्वितीय सत्राची परीक्षा जानेवारी, २०१९ मध्ये संपन्न झाली. एलएलएम सत्र १, २, ३ व ४ परीक्षेसाठी एकूण १६३० विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी ४६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले व ११६७ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. सदर परीक्षेसाठी एकूण ३६० विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी अर्ज केले होते व त्यांना उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती पुरविण्यात आल्या आहेत. यात कुठलाही गैरप्रकार झालेला आढळून आलेला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठात इंजिनीअरिंग मेकॅनिकल पेपरफुटीच्या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(७) ४१७५ (०७-०४-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठातील इंजिनीअरिंग मेकॅनिकल पेपरफुटीच्या प्रकरणाची सीआयडी चौकशीचा निर्णय विधीमंडळात घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विधीमंडळात घोषणा होवूनही अद्यापपर्यंत सीआयडी चौकशी न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, पेपरफुटी प्रकरणी सीआयडी चौकशी किती कालावधीत सुरु करण्यात येणार आहे वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी सीआयडी चौकशी करण्याबाबत गृह विभागास दि.१०.०२.२०२० रोजीच्या टिप्पणीन्वये विनंती करण्यात आली आहे.

---

**राज्यातील डिजिटल शाळांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत**

**(८) ५४६० (१०-०४-२०२०). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शाळांमध्ये डिजिटलायजेशन करूनही अनेक शाळा बंद असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार डिजिटल शाळांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत ,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परीक्षांबाबत**

**(९) ११९३७ (१३-०९-२०२०). श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परीक्षांबाबत अद्याप काहीच निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुक्त विद्यापीठाशिवाय अन्य सर्व अभ्यासक्रम हे सत्र आणि अंतर्गत मुल्यमापन पद्धतीनुसार आहेत परंतु यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची परीक्षा वार्षिक पद्धतीनुसार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रथम व द्वितीय वर्षांच्या परीक्षांचे गुण पाहून तिसऱ्या वर्षाचे मुल्यांकन करावे लागणार असल्याने प्रथम वर्षाचे मुल्यांकन कसे करायचे हा देखील अनुत्तरीत प्रश्न आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशतः खरे आहे.
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे सर्व शिक्षणक्रमास अंतर्गत मूल्यमापन प्रणाली आहे, यात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे सर्व शिक्षणक्रम आणि इतर विद्याशाखांचे पदव्युत्तर शिक्षणक्रमाच्या सत्र पध्दतीने परीक्षा आहेत तर इतर सर्व शिक्षणक्रम वार्षिक परीक्षा पध्दतीनुसार आहेत.
(३) हे खरे नाही.
विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २९/०४/२०२० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे प्रथम वर्षाचे मूल्यांकन करण्याचा निर्णय परीक्षा मंडळ बैठक दि.३०/०६/२०२० आणि ७/०९/२०२० नुसार घेण्यात आला आहे.
(४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि शासनाच्या दिनांक ८ मे, २०२० च्या पत्रानुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येऊन निकाल जाहीर झाले आहेत. तसेच अंतिम वर्ष/सत्र परीक्षांबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ऑनलाईन पध्दतीने परीक्षा आयोजित करुन निकाल जाहीर करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाला वेतनापोटी राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या निधीबाबत**

**(१०) १२७१२ (१३-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाला वेतनापोटी शासनाकडून देण्यात येणारा ३५६ कोटींचा निधी अद्यापही देण्यात आलेला नसल्याने सध्या विद्यापीठाला कर्मचाऱ्यांचे वेतन हे त्यांच्याकडील उपलब्ध निधीतूनच करावे लागत असल्याने मुंबई विद्यापीठाच्या तिजोरीवर सद्यस्थितीत भार येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाला वेतनापोटी देण्यात येणारा निधी प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत तसेच शासनास उक्त निधीबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे काय असल्यास सदरहू निधी किती कालावधीत देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलीआहे काय, असल्यास,चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२०-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) मुंबई विद्यापीठाच्या विविध मागण्यासंदर्भात मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.८ ऑगस्ट, २०१३ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तानुसार विद्यापीठातील कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांपैकी शासनमान्य पदावरील व विद्यापीठ निधीतील कर्मचाऱ्यांची यादी विभागीय सहसंचालकांना सादर करेपर्यंत ७५% वेतन अनुदान मंजूर करण्यात यावे असे निर्देश देण्यात आले. तसेच डॉ.रमा भोसले समितीच्या अहवालातील सुचनेनुसार अद्ययावत बिंदुनामावली विद्यापीठाने अद्यापही शासनास सादर केलेली नाही. सबब वरील अहवालातील त्रुटी पुर्ततेनंतर विद्यापीठाची थकबाकी ठरवता येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशासाठी लागणाऱ्या कागदपत्रांबाबत

**(११) १३८३२ (१३-०९-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशासाठी व शुल्क सवलतीसाठी उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, स्थानिक वास्तव्याचा दाखला, रहिवाशी दाखला या सारख्या दाखल्याची आवश्यकता असून राज्यातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता व विद्यार्थी व पालकांची सुरक्षा लक्षात घेता किमान यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्याचे प्रवेश सोईस्कर होण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जुन, २०२० मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पन्न दाखल्यासाठी स्वयं घोषणापत्राद्वारे वापर करण्याची मुभा देण्यात यावी तसेच जात प्रमाणपत्रासाठी घरातील वडील, काका अथवा भाऊ, बहीण अथवा थेट रक्त नाते संबंधांच्या जात प्रमाणपत्राच्या आधारावर विद्यार्थ्याला जात आरक्षण मधील प्रवेश देण्यात यावा किंवा सदर शैक्षणिक दाखले प्रवेश घेतल्यानंतर पुढील सहा महिन्यात अथवा वर्षभरात सादर करण्याची मुभा देण्यात यावी अशीही मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषगांने शासनाने यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांचा प्रवेश सोईस्कर होण्याच्या दृष्टीने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) शासनाच्या दि. २९ जुलै, २०२० रोजीच्या पत्रान्वये सन २०२०-२१ मधील इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ऑनलाईन वर्गाची लिंक शाळांकडून बंद करण्यात येत असल्याबाबत**

**(१२) १४४०४ (१३-०९-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ऑनलाईन वर्गांना माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक सत्रांचे वेळापत्रक विस्कळीत झाल्याने सी.बी.एस.ई. व राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यास कमी करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय अभ्यासक्रम कमी केला असतांनासुध्दा शाळांकडून पुर्ण शुल्क आकारण्याच्या तसेच शुल्क न भरल्यास ऑनलाईन वर्गाची लिंक शाळांकडून बंद करण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी पालकांनी शासनास केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे .

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी संबंधित कार्यालयांनी कार्यवाही केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) एमआयडीसी मध्ये होणाऱ्या प्रदूषणास जबाबदार असणाऱ्या उपप्रादेशिक अधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्याबाबत**

**(१३) १७१४२ (२६-११-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) एमआयडीसी मधील प्रदूषण निर्माण करणाऱ्या कारखान्यांची वर्गवारी करण्याचे आदेश देऊन प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर तीन टप्प्यात कारवाई करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रदूषणाला जबाबदार धरुन उपप्रादेशिक अधिकारी, कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (२१-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३)

• प्रश्नाधीन विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांकडून प्राप्त निर्देशानूसार डोबिंवली औद्योगिक वसाहतीतील रहिवाशी भागापासून १०० मिटरच्या परिघातील एकूण ३११ उद्योगांचे सर्वेक्षण / पाहणी दिनांक ११/०२/२०२० ते १८/०२/२०२० या कालावधीत करण्यात आली होती.

• सदर सर्वेक्षणाच्या पहिल्या टप्प्यात पाहणी करण्यात आलेल्या ३११ उद्योगांपैकी २१ उदयोगांना उत्पादन बंदचे आदेश, ४१ उदयोगांना उदयोग का बंद करण्यात येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस व ३ उदयोगांना अंतरिम आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत बजावण्यात आले होते. तसेच कोळसा इंधन म्हणून वापरणाऱ्या ८४ उदयोगांना त्यांचे धुळीकणांचे प्रमाण-१५० ug/m ५० ug/m३ पर्यंत कमी करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.

• सर्वेक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यात पाहणी करण्यात आलेल्या २९५ उदयोगांपैकी १५ उदयोगांना उत्पादन बंदचे आदेश, ३० उदयोगांना उदयोग का बंद करण्यात येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत बजावण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील व्यावसायिक महाविद्यालयांची शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) १८५१८ (२६-११-२०२०). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना सन २०१९-२० या वर्षातील शिक्षण शुल्क व शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे मागील सहा महिन्यांपासूनचे वेतन प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने शिष्यवृत्ती व शिक्षणशुल्क या महाविद्यालयांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत येणाऱ्या राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात पात्र ठरलेल्या १,८१,५४१ विद्यार्थाच्या शिष्यवृत्तीची रक्कम रु.६२२.८० कोटी, डीबीटी पोर्टलव्दारे वितरणासाठी सेंन्ट्रल पूल खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुशिक्षित बेरोजगारांना बेरोजगार भत्ता देण्याबाबत

**(१५) २०२५६ (१४-१२-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना काळात निमशासकीय व खाजगी क्षेत्रात असलेला रोजगार बंद झाल्याने सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार बंद झाल्याने उत्पादनाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्याने त्यांना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत असून त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे, काय,

(३) असल्यास, कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे तसेच राज्यात असलेल्या लॉकडाऊनमुळे नवीन उद्योग निर्माण होऊ न शकल्याने सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळविण्याचे प्रयत्न करण्यासाठी किमान रूपये १०००/- रोजगार भत्ता उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) रोजगार निर्मिती अथवा आर्थिक विकास या विभागाशी संबंधित विषय नाही.

(३) शासनाने ऑक्टोबर, २०२० मध्ये जाहीर केलेल्या नवीन धोरणानुसार बेरोजगार उमेदवारांच्या सेवा सोसायट्या स्थापन करून बेरोजगारांना स्वयंरोजगाराकडे वळविण्यासाठी विविध सवलती देवून त्यांना आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यात येते. शासन निर्णय दिनांक ११ फेब्रुवारी, २००४ नुसार बेरोजगार सेवा सोसायट्यांना प्रती वर्षी प्रती सभासद रू. १२००/- प्रमाणे तीन वर्षाकरीता व्यवस्थापकीय अनुदान देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयात अन्न व औषध प्रशासनाचे जिल्हा कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(१६) २०३२३ (०१-०१-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयाची सन २०१४ मध्ये स्थापना होऊन सहा वर्षे उलटूनही जिल्हयात अद्यापी अन्न व औषध प्रशासनाचे जिल्हा कार्यालय स्थापन करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. उपमुख्यमंत्री महोदयांना पालघर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाचे जिल्हा कार्यालय स्थापन करण्याची दिनांक १७ ऑक्टोबर, २०२० रोजी लेखी पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

दि. १४.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पालघर जिल्ह्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) पालघर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाचे जिल्हा कार्यालय स्थापन करण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. उप मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेले पत्र या विभागास प्राप्त झालेले नाही. तथापि, उक्त विषयाबाबत श्री.राजेद्र गावित, मा. लोकसभा सदस्य यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेल्या पत्राची प्रत या विभागास प्राप्त झालेली आहे.

(३) दि. १४.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पालघर जिल्ह्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून अन्न व औषध प्रशासनाच्या पालघर कार्यालयासाठी दि. २६.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये ०४ पदांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

प्रशासकीय भवन, पालघर येथे अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध झाली असुन, तेथे फर्निचरचे काम सद्यस्थितीत सुरू असुन, सदर काम पुर्ण झाल्यावर सदर जागेचा ताबा घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सर्व खाजगी शिक्षण संस्थांचे शाळा शुल्क कमी करण्याबाबत**

**(१७) २७२०२ (११-०६-२०२१). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्व खाजगी शिक्षण संस्थांचे शाळा शुल्क कमी करण्याचे निर्देश दिले असूनही महाराष्ट्र शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील अनेक राज्यांनी तेथील कायद्यांमध्ये सुधारणा करून शालेय फी मध्ये पन्नास टक्क्यांपर्यंत सवलत दिली असूनही महाराष्ट्र शासनाकडून कोणतीही सवलत दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक खाजगी शाळा नियमित सुरु नसतानाही त्यांच्याकडून प्रयोगशाळा फी, उपक्रम फी, बस फी, ओळखपत्र फी अशा अनेक प्रकारचे शुल्कही वसुल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शैक्षणिक शुल्क जमा केले नाही म्हणून विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण आणि त्यांचा निकाल थांबवण्यात आला याबाबतच्या अनेक तक्रारी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शिक्षण विभागाकडे केल्या आहेत हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) अशंतः खरे आहे.
(२) नाही.
(३) होय.
(४) होय.
(५) शासनाने शासन निर्णय १२ ऑगस्ट २०२१ अन्वये महाराष्ट्र शैक्षणिक संस्थामध्ये सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामधील शालेय शुल्कामध्ये १५ टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला असुन कोव्हीड-१९ महामारीच्या काळात विद्यार्थ्यांने शाळेची फी, थकीत फी भरली नाही म्हणुन शाळा व्यवस्थापनाने कोणत्याही विद्यार्थ्यांला प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन पध्दतीने शिक्षण घेण्यापासुन किंवा परिक्षेस बसण्यापासुन प्रतिबंध करु नये किंवा अशा विद्यार्थ्यांचा निकाल देखील रोखुन धरण्यात येऊ नये अशा सुचना सर्व मंडळाच्या सर्व माध्यमांच्या शाळांना देण्यात आल्या आहेत. तथापि सदर निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील रायगड तसेच मुंबई शहर व उपनगरात पालकांवर फी भरण्याकरिता सीबीएसई शाळांचे व्यवस्थापन दबाब आणत असल्याबाबत

**(१८) २७२१८ (११-०६-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः रायगड, मुंबई व उपनगर येथे कोरोनाची सद्यस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या पालकांना फी जमा करण्यासाठी मानसिक त्रास देणा-या सी.बी.एस.ई बोर्डाच्या शाळा व्यवस्थापनावर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०२१ रोजी वा त्या दरम्यान मा.शालेय शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व बोर्डाच्या व्यवस्थापनाच्या शाळांना विद्यार्थी आणि पालकांकडून शाळेची वर्षाची व आगामी वर्षाची फी जमा करतांना सहानुभूती दाखविणे, तसेच लॉकडाऊनमध्ये फी जमा करण्याबाबत सक्ती करण्यात येवू नये व लॉकडाउन कालावधी संपल्यानंतर शाळेची फी जमा करण्याबाबतच्या सूचना शासनाने दिनांक ३० मार्च, २०२० रोजीच्या परिपत्रकाद्वारे जारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग बंद करणे, सदर लॉकडाऊनच्या काळात इतर उपक्रम बंद असतानाही सदर उपक्रमाची फी आकारणे तसेच नवीन वर्षात पालकांना कोणतीही कल्पना न देता फी वाढवून त्यांच्यावर वाढीव फी भरण्यास दबाव टाकणे असे प्रकार शाळा व्यवस्थापनाकडून अद्यापही सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) या संदर्भातील निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) होय हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) कोव्हीड-१९ च्या काळात विद्यार्थ्यांनी शालेय शुल्क जमा केले नाही म्हणुन शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कोणत्याही विद्यार्थ्यांस शिक्षणापासुन वंचित ठेवण्यात येऊ नये तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयांकडून संबंधित शाळांना वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात शासनाने दिनांक १२ ऑगस्ट २०२१ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या असुन सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नद्यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत**

**(१९) २७३४० (११-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औद्योगिकरण आणि शहरीकरणामुळे प्रदूषण वाढ होत असून जलप्रदूषणात वाढ होऊन नद्यांची दुरवस्था झाली असून देशातील ३५१ नद्या अतिप्रदूषित या वर्गात येत असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सिपिसिबी) च्या अहवालात माहे मे, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये राज्यातील ५३ नद्यांचा समावेश असून मुंबईतील मिठी, उल्हास व विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यातील वर्धा आणि पैनगंगा तसेच वैनगंगा, कन्हान, वेणा या नद्यांचा समावेश सर्वाधिक प्रदूषित नद्यांमध्ये करण्यात आल्याने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने कृती आराखडा सादर केला असल्याचे दिनांक १५ मार्च २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने ॲक्शन प्लॅन सादर केला असून मुंबईतील मिठी नदीच्या पुनर्जीवनासाठी आतापर्यंत हजारो कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी खर्च करूनही मिठी नदी प्रदूषण मुक्त न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, काय चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२०-१२-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) व (४) मा. हरित दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दि. ११/०९/२०१९ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस निर्देश दिले होते. त्यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठी नदी पुनर्जीवनाचा कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलातील इमारतींना**
**मुंबई महापालिकेचे भोगवटा प्रमाणपत्राबाबत (ओ.सी.)**

**(२०) २७३७२ (१३-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलातील ६७ पैकी ३८ इमारतीना मुंबई महापालिकेचे भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी.) नसल्याची माहिती दिनांक १५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु इमारतीचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे काम केले असल्याने अल्पावधीतच या इमारती धोकादायक झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी उच्च स्तरावरुन चौकशी समिती नेमून यातील विद्यापीठाचे संबधित दोषी अधिकारी व कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई केली, तसेच उर्वरित इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१०-०१-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) खरे नाही.
(३) उर्वरित इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिके कडे मुंबई विद्यापीठाकडून पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा परिवहन विभागाला नवीन बसेस उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२१) २७४९९ (११-०६-२०२१). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा परिवहन विभागाअंतर्गत ७ बस आगारा मधील अंदाजे १०० पेक्षा अधिक बसेस निकामी, कालबाह्य व नादुरुस्त असल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे दिनांक ०१ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा बस स्थानकामध्ये दिनांक ०७ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास बसचे ब्रेक निकामी होऊन बस स्थानकात शिरुन होणारा मोठा अपघात टळला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने बुलढाणा परिवहन विभागासाठी नवीन बसेस उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१४-१२-२०२१) :** (१), (२) व (३) बुलढाणा विभागामध्ये दि.०१.०४.२०२१ रोजी एकूण ३९९ मंजूर नियतांकरिता ४३३ इतकी पुरेशी वाहने उपलब्ध होती. तसेच बुलडाणा विभागातील राज्य परिवहन वाहनांची स्थिती उत्तम ठेवण्याकरिता नियतकालिक कार्यक्रमानुसार वाहनांचे पुनस्थितीकरण, आरटीओ पासिंग इ. करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे खराब बॉडी कंडिशनची वाहने विभागीय कार्यशाळेत मागवून त्यांची बॉडी संबंधित कामे करुन दिली जातात. महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळेमध्ये मुळ ॲल्युमिनियम धातुमधील वाहनांची बॉडी एम.एस.धातुमध्ये पुनर्बांधणी करण्यात येते. अशा प्रकारातील ६२ वाहने विभागाच्या चालनात आहेत. बुलढाणा विभागातील आयुर्मान पुर्ण झालेली वाहने मोडीत काढण्यात आली असून, सन २०१८ पासून ते मे, २०२१ पर्यंत २२ नवीन वाहनांचा समावेश करण्यात आला आहे. अश्याप्रकारे बुलढाणा विभागातील वाहनांचा ताफा सुस्थितीत व सुदृढ ठेवण्यात आला आहे.

बुलढाणा बसस्थानाकामध्ये दि.०७.०४.२०२१ रोजी वा त्यासुमारास बसचे ब्रेक निकामी होवून बस स्थानकात शिरुन होणारा मोठा अपघात टळला, अशी कोणतीही घटना घडलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहेरी (जि.गडचिरोली) येथील धान व मका केन्द्र सुरु करुन**
**शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२२) २७५९२ (११-०६-२०२१). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी (जि.गडचिरोली) मतदार संघातील धान व मका केन्द्र सुरु करण्याचे आदेश शासनाने जाहीर करुनही शेतकऱ्यांच्या पिकाची उचल न केल्यामुळे दिनांक १८ ते २२ मे, २०२१ यादरम्यान आलेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या पिकांची झालेली नुकसान भरपाई देवून, खरेदी केन्द्रावर धान व मका या पिकांची उचल करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकपतिनिधींनी शासनाकडे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या पिकांची उचल न करणाऱ्या धान व मका केंद्रावरील कर्मचारी व इतर दोषींवर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासह धान व मका केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

स्थानिक ठिकाणी (अहेरी, जि.गडचिरोली) नुकसानीसंबंधाने निवेदने/तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) खरेदी केन्द्रावर धान व मका या पिकांची उचल करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे हे खरे आहे.

(३) शासन निर्णय, दि.२९ सप्टेंबर, २०२० अन्वये रब्बी पणन हंगाम २०२०-२१ साठी धान खरेदीसाठी दि.१ मे २०२१ ते दि.३० जून, २०२१ असा कालावधी निश्चित करण्यात आला होता. तथापि, खरीप पणन हंगाम २०२०-२१ मध्ये दि.३१ मार्च, २०२१ या अंतीम मुदतीपर्यंत उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी मार्फत मोठ्या प्रमाणावर धान खरेदी करण्यात आली. त्यामुळे अभिकर्ता संस्थांनी गोदाम उपलब्धतेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी यांचेमार्फत सिरोंचा तालुक्यात दि.०७.०६.२०२१ पासून ६ खरेदी केंद्रांवर धानाची खरेदी सुरु केली. तसेच सदर योजनेच्या लाभापासून शेतकरी वंचीत राहू नये, यासाठी लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार शासनाने रब्बी पणन हंगाम २०२०-२१ मध्ये धान खरेदीसाठी दि.३१ जुलै, २०२१ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हडपसर (जि.पुणे) महापालिका शाळांतील शालेय विद्यार्थ्यांना शालेय पोषण योजनेअंतर्गत पशुखादय पुरवठा केल्याबाबत

**(२३) २७६९६ (१२-०६-२०२१). श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील शाळा क्रमांक ५८ या मुलींच्या शाळेला दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेडमार्फत शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत महापालिकेच्या आदेशानुसार धान्य पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान्य पुरवठा करण्यात आलेल्या सदर शाळेत ३० हरभऱ्याच्या व २९ तुरडाळीच्या गोण्यांचा पुरवठा करण्यात आलेला असून, या गोण्यांमध्ये जनावरांना देण्यात येणारा हरभरा व तुरडाळ तसेच प्रत्येक गोणीत ५/५ किलो कडधान्य कमी असल्याचे दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या धान्याच्या गोणीवर महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शालेय पोषण आहार धान्याचे वितरण तसेच वाहनांच्या दर्शनी भागावर देखील अशा स्वरुपाचा उल्लेख करणे बंधनकारक असतांना तसा कोणताही उल्लेख नसल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शाळेत जनावरांसाठी पुरविण्यात येणारे धान्य विद्यार्थ्यांसाठी पुरवठा केल्याप्रकरणी पुणे महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी यांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) सदर प्रकरणी प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन त्रिस्तरीय समिती नेमून चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित पुरवठेदारावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

---

## राज्य परिवहन महामंडळाकडे कोणताही नवीन प्रकल्प नसताना खाजगी सल्लागाराला लाखो रुपये मानधन देण्यात येत असल्याबाबत

**(२४) २८१८६ (११-०६-२०२१). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य परिवहन महामंडळाकडे कोणताही नवीन प्रकल्प नसताना खाजगी सल्लागाराला प्रती माहे लाखो रुपये मानधन महामंडळाकडून देण्यात येत असल्याची बाब माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात परीवहन महामंडळाच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होत असताना अतिरिक्त खर्च कमी करणे आवश्यक असल्याने खाजगी सल्लागाराला प्रती माहे देण्यात येणारी रक्कम व जीएसटीच्या रक्कमेस नवीन प्रकल्प येईपर्यंत स्थगिती देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, स्थगिती देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०१-१२-२०२१) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळामध्ये विविध खात्यांचे प्रकल्प व खाते/शाखांचे संगणकीकरण करण्याकरिता आवश्यक शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, दि.०१.०७.२०१४ नुसार सल्लागारांची नेमणूक करण्यात आली असून, त्यांना सदर शासन निर्णयान्वये शुल्क अदा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२५) ३०२०९ (११-०६-२०२१). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्यावतीने शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांकडून प्रत्यक्षपणे धान खरेदी करण्यात आले त्यांचे सातबारे जमा करण्यात आले मात्र सातबारा ऑनलाईन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धानाची प्रत्यक्षपणे खरेदी न करता शेतकऱ्यांच्या नावावर आदिवासी विकास महामंडळ, जिल्हा मार्केटिंग फेडरेशनचे अधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समिती चामोर्शीचे व्यवस्थापक, अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने सातबारा ऑनलाईन करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे ज्या शेतकऱ्यांकडून प्रत्यक्षपणे धान खरेदी करण्यात आले त्याना धानाची रक्कम व बोनस अजून पर्यंत मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (२१-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
धान खरेदी करीता शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणी करण्यात आलेली असून संबंधीत सर्व शेतकऱ्यांचे ऑनलाईन ७/१२ उतारे घेण्यात आलेले आहेत.
(४) हे खरे नाही.
ऑनलाईन धान खरेदी केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे शेतकरी चुकारे अदा करण्यात आलेले आहे.
शासनाकडून अभिकर्ता संस्थांमार्फत शेतकऱ्यांना अदा करावयाच्या प्रोत्साहन राशीसाठीचा (बोनस) निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील आधारभुत धान खरेदी केंद्राकरीता भाडयाने घेतलेल्या गोदामांचे थकीत भाडे मिळण्याबाबत**

**(२६) ३०८९९ (१८-०६-२०२१). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी (जि.गडचिरोली) मतदार संघासह संपुर्ण गडचिरोली जिल्हयात आदिवासी विकास महामंडळ व महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह महामंडळाच्यावतीने आधारभुत धान खरेदी योजनेतुन खरेदी केलेल्या धानाची साठवणुक करण्याकरीता खाजगी, सहकारी संस्था यांची गोदामे भाडयाने घेतली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरमोरी, देसाईगंज, कुरखेडा व कोरची तालुक्यासह गडचिरोली जिल्हयातील भाडयाने घेतलेल्या धान्य गोदामांचे मागील ४ ते ५ वर्षापासुन भाडे थकीत असल्याची बाब माहे मे, २०२१ च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संपुर्ण गडचिरोली जिल्हयात गोदामांचे भाडे थकीत असून आधारभुत धान खरेदी करीता गोदाम नसल्याने शासकीय धान खरेदी बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, थकीत असलेले गोदामांचे भाडे अदा करुन शासकीय धान खरेदी सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) शासन निर्णयातील तरतुदीनुसार गडचिरोली जिल्ह्यात धानाची खरेदी करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हास नगर (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीत केमिकल माफियांकडून विषारी रसायन सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२७) ३१३२७ (१८-०६-२०२१). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हास नगर येथील वालधुनी नदीत केमिकल माफियांकडून विषारी रसायन सोडण्यात आले असल्याने परिसरातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने याबाबत संबंधितांविरुध्द तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीसाठी मंडळाकडून दिनांक १० जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास पाहणी केली असता प्रथमदर्शनी मे. बायोक्झिरा फार्मा प्रा.लि. या कारखान्याचे सांडपाणी नाल्यामध्ये कंपाऊड मधून झिरपुन जात असल्याचे निदर्शनास आले असल्याने दि. १३ जानेवारी, २०२१ रोजी सदर कारखाना बंद करण्याचे आदेश देण्यात आले

असून कंपनीविरूध्द शिवाजी नगर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात (मे. सेच्युरी रेयॉन कंपनीच्या जवळ) बेकायदेशीरपणे टँकरद्वारे रसायन सोडत असल्याने याबाबत टँकरवर उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडून दिनांक १६ जानेवारी, २०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून चिखलोली-मोरिवली येथील टँकरविरुध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक पोलिसांकडे संरक्षण देण्याबाबत कळविण्यात आले असून अनधिकृत टँकरवर लक्ष ठेवण्यासाठी एकूण १७ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रश्न भाग ३ व ४ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५)

• उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रात (मे. सेच्युरी रेयॉन कंपनीच्या जवळ) बेकायदेशीरपणे टँकरद्वारे रसायन सोडत असल्याचे आढळल्याने सदर टँकरवर उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक १६/०१/२०२१ रोजी पोलीस ठाणे, उल्हासनगर कॅम्प-१ येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

• चिखलोली-मोरिवली येथील टँकरविरुध्द कारवाई करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून स्थानिक पोलिसांकडे संरक्षण पुरविण्याबाबत दिनांक २७/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

• महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अनधिकृत टँकरवर लक्ष ठेवण्यासाठी एकूण २३ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत**

**(२८) ३२२८५ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनामुळे परिवहन महामंडळाची सेवा बंद असून शासनाने कामगारांचे सहा महिन्यापासून वेतन दिले नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामगारांना तातडीने वेतन देण्यात यावे तसेच सन २०१९ मध्ये भरती करुन कपात करण्यात आलेल्या जवळपास साडेचार हजार कामगारांना सेवेत घेण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जुलै, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळाच्या कर्मचारी व अधिकारी यांना कडक निर्बंधाच्या पार्श्वभूमीवर पुढील सहा महिने वेतनासाठी शासनाने निधी द्यावा असा प्रस्ताव दिनांक २६ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा. परिवहन मंत्री यांनी राज्य शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) शासनाद्वारे राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासन निर्णय दि.०५.०५.२०२१ अन्वये रु.१३० कोटी, दि.२२.०७.२०२१ अन्वये रु.३०० कोटी, दि.०८.०७.२०२१ अन्वये रु.३०० कोटी व दि.०२.०९.२०२१ अन्वये रु.५०० कोटी उपलब्ध करुन दिलेले आहेत.

कोविड-१९ या आजारामुळे महामंडळाची वाहतुक मोठया प्रमाणात ठप्प झाली होती. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जास्त चालक/वाहक उपलब्ध असल्याने, सन-२०१९ अंतर्गत चालक तथा वाहक पदामध्ये नेमणूक देण्यात आलेल्या रोजंदार गट क्र.१ मधील तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा दि.०३.०९.२०२० पासून पुर्ववत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खाजगी शिक्षण संस्थांचे शाळा शुल्क कमी करण्याबाबत**

**(२९) ३२३०६ (१०-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्व खाजगी शिक्षण संस्थांचे शाळा शुल्क कमी करण्याचे निर्देश दिले असूनही महाराष्ट्र शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील अनेक राज्यांनी तेथील कायद्यांमध्ये सुधारणा करून शालेय फी मध्ये पन्नास टक्क्यांपर्यंत सवलत दिली असूनही महाराष्ट्र शासनाकडून कोणतीही सवलत दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक खाजगी शाळा नियमित सुरु नसतानाही त्यांच्याकडून प्रयोगशाळा फी, उपक्रम फी, बस फी, ओळखपत्र फी अशा अनेक प्रकारचे शुल्कही वसुल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच शैक्षणिक शुल्क जमा केले नाही म्हणून विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण आणि त्यांचा निकाल थांबवण्यात आला याबाबतच्या अनेक तक्रारी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शिक्षण विभागाकडे केल्या आहेत हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) अशंत: खरे आहे.
(२) नाही.
(३) होय.
(४) होय.
(५) शासनाने शासन निर्णय १२ ऑगस्ट २०२१ अन्वये महाराष्ट्र शैक्षणिक संस्थामध्ये सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामधील शालेय शुल्कामध्ये १५ टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला असुन कोव्हीड-१९ महामारीच्या काळात विद्यार्थ्यांने शाळेची फी, थकीत फी भरली नाही म्हणुन शाळा व्यवस्थापनाने कोणत्याही विद्यार्थ्यांला प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन प्रध्दतीने शिक्षण घेण्यापासुन किंवा परिक्षेस बसण्यापासुन प्रतिबंध करु नये किंवा अशा विद्यार्थ्यांचा निकाल देखील रोखुन धरण्यात येऊ नये अशा सुचना सर्व मंडळाच्या सर्व माध्यमांच्या शाळांना देण्यात आल्या आहेत. तथापि सदर निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमडापुर (ता. चिखली, जि.बुलडाणा) येथील बस स्थानकाचे बांधकाम संथ गतीने सुरू असल्याबाबत**

**(३०) ३२३३५ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमडापुर (ता चिखली, जि.बुलडाणा) येथील बस स्थानकाचे बांधकाम सन २०१७ पासून सुरू करण्यात आले असून काम पूर्ण करण्याचा कालावधी हा ९ महिने असताना तीन वर्षे होऊनही अद्याप काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्याप काम पूर्ण न झाल्याने कामाच्या अंदाजपत्रक किंमतीत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर काम पुर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०१-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) बसस्थानक बांधकामास दि.२८.०२.२०१८ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून बांधकाम परवानगी मिळाली आहे. कोव्हिड-१९ या आजाराचा संसर्ग, निधीची कमतरता, रेतीची कमतरता या कारणास्तव विलंब झाला. सद्यस्थितीत बसस्थानकाचे काम तात्काळ पुर्ण करुन घेण्यासाठी विभागाकडून कार्यवाही सुरु असून, बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड मनपा हद्दीतील मनपाच्या थेरगाव शाळेतील शालेय पोषण आहाराची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ३२३५३ (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मनपाच्या थेरगाव येथील माध्यमिक शाळेत शासन निर्णयानुसार शालेय पोषण आहार प्रतिभा महिला प्रतिष्ठान या बचत गटामार्फत पुरविण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महिला बचत गटाच्या शालेय पोषण आहाराचे सन २०१८-१९ मधील लाखो रुपयांचे देयके प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कोविड-१९ च्या लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर महिला बचत गटांना आर्थिक निकड असतानाही पोषण आहाराचे प्रलंबित असलेल्या देयकांची महिला बचत गटामार्फत वारंवार सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही अद्यापही देयके जमा झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
प्रस्तुत महिला बचत गटाचे रु.३५,७२३ इतक्या रक्कमेचे देयके प्रलंबित आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) संबंधित शाळांनी MDM पोर्टलवर भरलेल्या दैनंदिन उपस्थितीच्या आधारे देयके शाळांना अदा केली जातात. सदरप्रमाणे दैनंदिन उपस्थितीची संबंधित शाळेने माहिती भरली नसल्याने त्यांची देयके प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन अदा करण्यात आलेली नाहीत.

---

**अन्न आणि औषध प्रशासन विभागात सेवा प्रवेश नियम डावलून पदोन्नतीने अधिकाऱ्यांची नियमबाह्य रित्या करण्यात आलेली भरती**

**(३२) ३२३७६ (२३-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडून सहाय्यक आयुक्त (अन्न) पदासाठी सेवा प्रवेशाचे नियम डावलून तसेच सामान्य प्रशासन विभागाची दिशाभूल करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता न घेता ३६ अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवाप्रवेश नियम डावलून सरळ सेवेच्या रिक्त पदांवर पदोन्नतीद्वारा नियुक्ती करण्यात आल्याने तसेच उमेदवारांना संधी देण्यात न आल्याने एम.पी.एस. सी स्टुडंट राइट्स या संघटनेच्या वतीने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या प्रधान सचिव यांना निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाच्या सहाय्यक आयुक्त अन्न संवर्गाची मंजूर पदांपैकी सेवाज्येष्ठतेनुसार १३ पदे भरणे अपेक्षित असताना नियमबाह्य रित्या ३६ पदे भरण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सरळसेवेद्वारे भरायची पदे कमी होऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या एमपीएससी विद्यार्थ्यांमध्ये अन्याय होत असल्याचे तसेच सदर भरती प्रक्रियेस स्थगिती देऊन भरती प्रक्रियेची चौकशी करून नियमबाह्य रित्या सेवाज्येष्ठतेने पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची पदोन्नती रद्द करण्यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२३-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) एम पी एस सी स्टुडंट राइट्स या संघटनेचे निवेदन विभागास प्राप्त झालेले आहे ही बाब खरी आहे. तथापि, सेवाप्रवेश नियम डावलून सरळ सेवेच्या रिक्त पदांवर पदोन्नतीद्वारा नियुक्ती करण्यात आल्याची बाब खरी नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील परिवहन विभागातील प्रादेशिक व उपप्रादेशिक सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३३) ३२३८२ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहतूक वाहनांच्या संख्येत वाढ होऊन मागील तीन वर्षात त्यांची संख्या सुमारे तीन कोटी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील परिवहन खात्यात प्रादेशिक, उपप्रादेशिक सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांची सुमारे तीनशे पदे रिक्त असल्याचे पाहणी अहवालात निदर्शनास आले असून मागील अनेक वर्षात परिवहन विभागातील अनेक अधिकारी निवृत्त झाल्याने प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची ३६ व मोटर वाहन निरीक्षक शिक्षकांची २८३ पदे रिक्त असल्याने परिवहन अधिकाऱ्यांवर कामाचा भार वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिवहन विभागात पुरेशा प्रमाणात अधिकारी वर्ग नसल्याने शिकाऊ उमेदवारांची चाचणी घेणे, रस्त्यावर धावणाऱ्या बेशिस्त वाहनांवर कारवाई करणे, सीमा तपासणी नाक्यांवरील रहदारीवर नियंत्रण ठेवणे, गाड्यांची चाचणी घेऊन फिटनेस प्रमाणपत्र देणे इत्यादी कामांसाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रादेशिक परिवहन अधिकारी-०९, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी-०४, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी-२२, मोटार वाहन निरीक्षक-२८० व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक -४६५ एवढी पदे सेवानिवृत्ती व पदोन्नतीमुळे रिक्त आहेत.

कोविड-१९ या संसर्गजन्य विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत करावयाच्या योजनेनुसार नव्याने करावयाची पदभरती बंद करण्यात आली आहे.

तथापि, मोटार वाहन विभागाचे संगणकीकरण झाले असून, ऑनलाईन अर्ज करण्याच्या सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच सदर कार्यालयातील डेटा इंन्ट्री (Data Entry), शुल्क व कर भरणा हे E-Payment द्वारे होत असून उपलब्ध कर्मचारी वर्गामध्ये दैनंदिन कामकाज करण्यात येत आहे.

(३), (४) व (५)

परिवहन विभागाचे बहुतांश कामकाज हे ऑनलाईन पध्दतीने केले जात आहे. तसेच प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यावर धावणाऱ्या बेशिस्त वाहनांवर वायुवेग पथकामार्फत करण्यात येते. सीमा तपासणी नाक्यांवरील रहदारीवर नियंत्रण ठेवण्याचे कामकाज तेथील अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत करण्यात येते. सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना त्यांच्या अभिलेखावर असलेली वाहनांची संख्या विचारात घेऊन योग्यता प्रमाणपत्र, नुतणीकरण तसेच प्रलंबित असलेल्या वाहनाचे कामकाज कायदयातील तरतूदीनूसार प्राधान्याने करण्याबाबत परिवहन आयुक्त यांनी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दि. १७.०१.२०२१ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यात रासायनिक कंपन्या तसेच वाहनांमुळे वायु व जल प्रदुषण होत असल्याबाबत

**(३४) ३२७३८ (२९-११-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कंपन्यांमुळे तसेच वाहनांमुळे मोठया प्रमाणात वायु व जल प्रदुषण होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील खारघर येथे वातावरण एका संस्थेने केलेल्या प्रयोगात तयार केलेल्या कृत्रिम ह्रदयाच्या प्रतिकृती १० दिवसात काळया पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रासायनिक कारखाने व वाहनांमुळे होणारे वायु व जल प्रदुषणाबाबत वारंवार शासनाच्या निदर्शनास आणूनसुद्धा संबंधीत विभागाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे दिवसेंदिवस प्रदुषणास वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दुर्लक्ष करणा-या संबंधीत विभागाच्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

वैद्यकिय अधिकारी, पनवेल महानगरपालिका यांच्या अहवालानुसार, वायु प्रदूषणामुळे रूग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

(२) याबाबत स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांची वेळोवेळी पाहणी केली जाते व पाहणीदरम्यान दोषी आढळलेल्या कारखान्यांवर कारवाई केली जाते.

त्याचप्रमाणे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून देखील वायुवेग पथकांद्वारे मोटार वाहनांची तपासणी करून वैध वायू प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र न बाळगणा-या वाहनचालकांवर कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिवरखेडा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेबाबत**

**(३५) ३३३६७ (१८-११-२०२१). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरखेडा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमध्ये पाच वर्गासाठी एकच वर्गखोली उपलब्ध असल्याने शिक्षक व विद्यार्थ्यांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रांगणात समाज मंदिरात बसून शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही .खरे आहे काय,

(३) असल्यास हिवरखेडा ग्रामस्थांनी अनेकवेळा जिल्हापरिषद व तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाकडे वर्ग खोल्या बांधून देण्याबाबत मागणी करुनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-१२-२०२१) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

जिल्हा परिषद शाळा, हिवरखेडा या शाळेत ५५ विद्यार्थी शिक्षण घेत असून एक वर्गखोली उपलब्ध आहे. इयत्ता १ ली ते ३रीचे विद्यार्थी वर्गखोलीत व इयत्ता ४ थी व ५ वीचे विद्यार्थी व्हरांड्यात बसून शिक्षण घेत आहेत.

(३) व (४)

संबंधित शाळेने वर्ग खोली मागणीचा प्रस्ताव सादर केलेला नाही. तथापि जिल्हा परिषद स्तरावर हिवरखेडा ग्रामस्थांचे १ निवेदन प्राप्त झाले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना शिक्षण हक्क कायद्यानुसार (RTE) आवश्यक असलेल्या मुलभूत सोई-सुविधा भारत सरकारकडून समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीच्या मर्यादेत मंजूर करण्यात येतात. तसेच जिल्हा परिषदांकडून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार-खासदार निधी, चौदावा/ पंधरावा वित्त आयोग व सी.एस.आर इत्यादी माध्यमांतून उपलब्ध केल्या जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गडगा (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील स्वच्छ भारत मिशन योजने अंतर्गत शौचालयाचे अनुदानामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३६) ३३६२० (१८-११-२०२१). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गडगा (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील स्वच्छ भारत मिशन योजने अंतर्गत शौचालयाचे अनुदान सरपंच, ग्रामसेवक यांनी गैरव्यवहार केला असून माहे ऑक्टोंबर, २०२० रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ भारत मिशन योजने अंतर्गत मोठ्या प्रमाणात सरपंच, ग्रामसेवक आणि त्यांना पाठीशी घालणारे गटविकास अधिकारी यांच्या संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार शौचालय योजनेत केला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी समितीव्दारे या गावात लाभार्थीनिहाय शौचालयाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून उक्त परिस्थितीची पाहणी करण्यात आली आहे काय व पाहणीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर शासनाकडून कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-१२-२०२१):** (१) ग्रामपंचायत मौजे-गडगा, तालुका- नायगांव, जिल्हा-नांदेड अंतर्गत सन २०१८-१९ या वर्षामध्ये, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) योजनेत भ्रष्टाचार झाल्याबाबत, माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये जिल्हा परिषद, नांदेड यांना तक्रार प्राप्त झाली होती.

(२) ग्रामपंचायत मौजे-गडगा, तालुका-नायगांव, जिल्हा-नांदेड अंतर्गत स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) योजनेमध्ये सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या कालावधीत अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले होते. सन २०१८-१९ या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचा अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) होय,

(४) चौकशी अहवालानुसार संबंधित तत्कालीन ग्रामसेवक श्री.एस. व्ही. कौसल्ये, श्री. एम. एम. शेख व श्री.डी. एस. केते यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, त्यांचेविरुध्द दोषारोप बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शौचालयाबाबत**

**(३७) ३४३१६ (१८-११-२०२१). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या १३७ शाळांमध्ये मुलांचे तर ७१ शाळेत मुलींचे शौचालय नसल्याची घटना अशोभनीय आहे, सर्व शिक्षा अभियान, डीपीसी त्या माध्यमातून शाळेसाठी निधी उपलब्ध होत असतो तरीही शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याची माहे सप्टेंबर २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण ६५० शौचालय निकृष्ट दर्जाची असून ती वापरणे योग्य नाहीत तसेच २२२ शाळांना संरक्षक भिंतही नाही व ४२४ शाळांचे संरक्षक भिंतीचे काम अर्धवट आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी मोठया प्रमाणात निधी मिळूनही शौचालयांना संरक्षक भिंती न बांधल्याचे लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रार सादर केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून उक्त परिस्थितीची पाहणी करण्यात आली आहे काय व पाहणीच्या अनुषंगाने प्राथमिक शौचालयाची सुविधा त्वरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषदेच्या एकूण ५१६ शाळांमधील शौचालये निकृष्ट दर्जाची आहे. तसेच २१८ शाळांमध्ये संरक्षक भिंत नसून ४११ शाळांमध्ये संरक्षक भिंतीचे काम अर्धवट आहे.
(३) होय.
(४) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना शिक्षण हक्क कायद्यानुसार (RTE) आवश्यक असलेल्या मुलभूत सोई-सुविधा भारत सरकारकडून समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीच्या मर्यादेत मंजूर करण्यात येतात. तसेच जिल्हा परिषदांकडून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार-खासदार निधी, चौदावा/ पंधरावा वित्त आयोग व सी.एस.आर इत्यादी माध्यमांतून उपलब्ध केल्या जातात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात भ्रष्टाचार झाल्याबाबत

**(३८) ३५३५७ (२९-११-२०२१). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानामध्ये सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ या वर्षामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून अंदाजे ४ हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याबाबत आरटीई फाऊंडेशनने मा. शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तक्रार केल्याचे माहे एप्रिल, २०२१ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही. तथापि, अशा स्वरुपाच्या चुकीची तक्रारी प्राप्त आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील प्रदुषण कमी होण्याच्या दृष्टीने सी-४० सिटीजन संस्थेने केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणेबाबत

**(३९) ३५६५६ (२९-११-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशभरातील कोळसाधारित विद्युतनिर्मिती प्रकल्पांपैकी ९ टक्के प्रकल्प मुंबईपासून ५०० कि.मी. अंतरावर असल्याने यातून होणाऱ्या प्रदुषणामुळे पुढील दशकात मुंबईत ६२०० जणांचा अकाली मृत्यु होण्याची आणि ३२०० बालकांचा मुदतपूर्व जन्म होण्याची शक्यता कोळसाधारित विद्युतनिर्मिती प्रकल्पाविषयी "सी-४० सिटीजने"संस्थेने केलेल्या संशोधनातून व्यक्त केली असल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहराला प्रदुषणाच्या विळख्यापासून वाचविण्याकरिता कोळसाधारित विद्युत निर्मिती प्रकल्पातून होत असलेले वाढते प्रदुषण तात्काळ रोखण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणेबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (१७-१२-२०२१) :** (१) सी-४० सिटीजने या संस्थेने या प्रकारचा अहवाल सादर केला आहे. हे खरे आहे.

(२) मुंबई स्थित टाटा पॉवर कंपनी लि. येथील औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रण व ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा बसविली असून ती कार्यान्वित आहे. त्याची वेळोवेळी पाहणी केली जाते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांशी पालन करीत हवा तपासणी केंद्रे मुंबईत ११ ठिकाणी उभारलेली आहेत. त्याच्या पृथ्थ:करण अहवालानुसार हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) हा सर्वसाधारणपणे समाधानकारक ते मध्यम या गुणवत्तेत येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खारेपाट (ता.पेण, जि.रायगड) भागातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(४०) ३५७३८ (२९-११-२०२१). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारेपाट (ता.पेण, जि.रायगड) भागातील हेटवणे धरणातून मुंबईला पाणी पुरवठा होतो परंतु येथील स्थानिकांना दरवर्षी पाणी टचांईचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशी, शहापाडा ते भाल या गावापर्यंत सुमारे २० ते २५ गाव व वाडयांना पाणीपुरवठा करणारी ३० ते ४० वर्षांपुर्वीची पाईपलाईन नादुरुस्त झाल्याने या भागात नियमित व योग्य प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागात माहे ऑक्टोबर ते जुन या काळात पाणी टंचाई निर्माण होत असल्याने नळपाणी पुरवठा ३ दिवसाआड करुन टँकरव्दारे देखील पाणी पुरवठा केला जातो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या भागातील पाणी टंचाई दूर होण्यासाठी सिडकोकडून खारेपाट विभागास अधिक प्रमाणात पाणी मिळावे अशी मागणी स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०८-१२-२०२१) :** (१) होय,
(२) अंशत: खरे आहे

दरवर्षी उन्हाळयामध्ये धरणातील पाण्याची पातळी कमी होत असल्याने शहापाडा गुरुत्वीय प्रादेशीक नळ पाणी पुरवठा योजनेमधुन वाशी ते भाल या योजनेतील शेवटच्या गावांना पुरेशा दाबाने व पुरेसा पाणी पुरवठा होत नाही.

तसेच सदर योजनेतील पाईपचे आयुष्यमान संपले असल्याने पाणी गळतीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे यातील काही गावांना उन्हाळयामध्ये टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो.
(३) व (४) होय,
(५) सदर योजना सुमारे ५० वर्षापूर्वीची असल्याने तिचे आयुष्यमान संपले असून त्यामुळे पाईप लाईन ही जीर्ण होऊन फुटत आहे.

वाढीव उद्‌भव शहापाडा प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना हेटवणे धरण ते शहापाडा धरण नविन पाईप लाईनचे काम प्रगतीपथावर आहे

तसेच जल जीवन मिशन कार्यक्रमांअंतर्गत उत्तर शहापाडा मधील ९ वाढीव पाणी साठवण टाक्या व उत्तर शहापाडा मधील २६ गावे व दक्षिण शहापाडा मधील १२ गावे असे एकूण ३८ गावांना जुनी व जीर्ण वितरण व्यवस्था बदलून नवीन वितरण व्यवस्थेचे अंदाजपत्रक तयार केले असून मंजुरीची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही

---

## राज्यातील प्राथमिक शिक्षकांना सुधारित वेतन श्रेणी लागू करण्याबाबत

**(४१) ३५८३४ (२९-११-२०२१). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षक सेवक कालावधी पुर्ण केल्यानंतर सहाव्या वेतन आयोगाप्रमणे ५२००-२०२०० (ग्रेड पे २८००) ही वेतनश्रेणी मिळत होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राथमिक शिक्षकांना पदोन्नतीच्या संधी नसल्याने १२ वर्षाच्या नियमित सेवा कालावधीनंतर चटोपाध्याय समितीने शिफारस केल्याप्रमाणे पुढील वेतनश्रेणी ९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००) लागू करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातव्या वेतन आयोगाप्रमाणे लागू करण्यात आलेली वेतनश्रेणीही सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीच्या तुलनेत फरक असल्याचे तसेच जेष्ठ शिक्षकांना रु.३५९८ इतकी वाढ अपेक्षित असताना ती फक्त रु. ७०० इतकीच वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शिक्षकांनी वरिष्ठ वेतन श्रेणीची मागणी केल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याकरीता राज्य शासनाने श्री.के.पी. बक्षी, सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी शासनाने काही फेरफारासह स्वीकृत करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने इतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांबरोबर शासकीय शाळांतील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१८ च्या दि.३०/१/२०१९ अन्वये अधिसूचित केले आहेत. तसेच या नियमांनुसार प्रारंभिक वेतननिश्चिती बाबतची सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. या आधारे राज्यातील या विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये व सैनिकी शाळांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना दिनांक २२/२/२०१९ अन्वये लागू करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नवीन इमारतीबाबत**

**(४२) ३५८४३ (२९-११-२०२१). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मागील अनेक वर्षांपासून खाजगी जागेत सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या (तळमजला + पहिला मजला) प्रशासकीय मान्यतेचे रु. १७६६.७१ लक्ष रकमेचे अंदाजपत्रक व नकाशे हे मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्या कार्यालयाच्या तांत्रिक बाबी तपासून अपर परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारत बांधकामाचे मांडणी नकाशे हे उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी प्रमाणित करून सदर नकाशात उपभोक्ता खात्याच्या मागणी व आवश्यकतेनुसार सर्व बाबी समाविष्ट करुन अपर परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. ४९३९ दिनांक १५ जुलै, २०२० अन्वये सदरील कामाचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंत्रालयात सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नवीन इमारत बांधकामासाठी मौजे लोखंडी सावरगाव (ता.अंबाजोगाई,जि.बीड) येथे १०.०० एक्कर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अंबाजोगाई हे जिल्हास्तरीय ठिकाण असल्यामुळे, अंबाजोगाई, केज, धारूर, माजलगाव, परळी या तालुक्यातील लोकांना नवीन व जुन्या वाहनांच्या पासिंग व इतर संबंधित कामांसाठी अंबाजोगाई येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात यावे लागत असल्याने अंबाजोगाई येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नवीन इमारत बांधकामास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अंबाजोगाईच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नवीन इमारत बांधकामास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१६-१२-२०२१) :** (१) होय
(२) व (३) गृह विभाग शासन निर्णय क्र. एमव्हडी-९२०/प्र.क्र.१७७/परि-४ दि.२४.०२.२०२१ अन्वये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई जि. बीड या कार्यालयासाठी इमारत बांधकामाच्या रूपये ११,३१,२१,३९४/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) होय.
(५) होय.
(६) कोविड-१९ संसर्गाच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या आर्थिक निर्बंधामुळे सदर बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देता आला नाही.

---

## कुरुड (ता.देसाईगंज, जि.गडचिरोली) येथील ए.ए. एनर्जी पॉवर प्लॉन्ट व देसाईगंज शहरातील राईस मिल तसेच पोहा मिल मुळे होत असलेल्या प्रदुषणाबाबत

**(४३) ३६०८६ (२९-११-२०२१). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरुड (ता.देसाईगंज, जि.गडचिरोली) येथील ए.ए. एनर्जी पॉवर प्लॉन्ट व देसाईगंज येथील जेजानी राईस व शहरातील इतर राईस मिल तसेच पोहा मिलच्या चिमणीमधुन

उडणाऱ्या राखेमुळे हवा प्रदुषणात वाढ होऊन नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक नागरीकांनी प्रदुषण नियामक मंडळ, चंद्रपुर यांचेकडे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०२१ रोजी मा. मंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन संबंधीत कारखान्यांना प्रतिबंधात्मक उपाय करण्याच्या सुचना देऊन प्रदुषण कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर कार्यवाहीचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (१७-१२-२०२१) :** (१), (२) व (३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांच्या अहवालानुसार परिसरातील नागरीकांमध्ये प्रदूषणामुळे कोणत्याही प्रकारचे आजार आढळून आल्याचे दिसून येत नाही.

स्थानिक लोकप्रतिनीधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने परिसरातील उद्योगांची पाहणी करण्यात आली व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या आधारे मे. ए. ए. एनर्जी लि. या उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजावून सदर उद्योगाची रु. ५ लक्ष इतक्या रकमेची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. तसेच, पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या राईस मिल उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकास वाढीसाठी कमी कालावधीचे प्रशिक्षण देण्याबाबत**

**(४४) ३६१३० (२९-११-२०२१). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात विद्यार्थी ऑनलाईन माध्यमातून शिक्षण घेत असल्यामुळे मुलांमध्ये अपेक्षित कौशल्य विकास होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्षात प्रात्यक्षिके न होऊ शकल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना (विशेषतः अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना) कामकाजाच्या ठिकाणी अडचणी येण्याची शक्यता लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास वाढीसाठी महाविद्यालये आणि औद्योगिक कंपन्या यांच्या समन्वयाने कमी कालावधीचे विशेष प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

कोरोना काळात महाविद्यालयांनी ऑनलाईन माध्यमातून प्रात्यक्षिके घेतली असून, काही महाविद्यालयांनी प्रात्यक्षिकांचे व्हिडीयो देखील तयार करुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत.

कोरोना काळात महाविद्यालये बंद असल्याने प्रत्यक्ष प्रात्यक्षिके घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रात्यक्षिके ऑनलाईन माध्यमातून घेण्यात आलेली आहेत. तथापि, कौशल्य विकास वाढीसाठी ऑनलाईन इंटरर्नशीपचा पर्याय जेथे शक्य तेथे (संगणक अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स डिझाईन इत्यादी) वापरण्यात आला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी (जि. ठाणे) येथे अन्न व औषध प्रशासनाच्या विशेष टास्क फोर्सने धाड टाकून गुटखा जप्त केल्याबाबत**

**(४५) ३६१४६ (२९-११-२०२१). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) येथे अन्न व औषध प्रशासनाच्या विशेष टास्क फोर्सने धाड टाकून सुमारे ३ कोटी रूपयांचा हुक्का, तंबाखू, गुटखा जप्त केल्याचे दिनांक ०९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुटखा विक्री व साठा केल्याप्रकरणी दोन व्यापाऱ्यांच्या विरुद्‌ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम वॉटर डीस्ट्रीब्युशन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कं. प्रा. लि. कंपनीच्या सचिवांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४६) ३६१८६ (२९-११-२०२१). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिकांना व ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम वॉटर डीस्ट्रीब्युशन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कं. प्रा. लि. कंपनीच्या सचिवांनी आपल्या पदाचा गैरवापर करून तसेच गैरव्यवहार करून शासनाची फसवणूक केल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते श्री. संजय चौधरी यांनी मा. पाणीपुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. प्रधान सचिव, पाणीपुरवठा, मा. आयुक्त, सर्व महानगरपालिका ठाणे जिल्हा, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कं. प्रा. लि. कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांची बेकायदेशीररित्या नियुक्ती केली असल्याचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते श्री. भूषण विजय पाटील यांनी मा. पाणीपुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव, पाणीपुरवठा, आयुक्त, सर्व महानगरपालिका ठाणे जिल्हा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्टेम वॉटर डीस्ट्रीब्युशन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कं. प्रा. लि. कंपनीच्या सर्व गैरप्रकाराची चौकशी करण्याचे निर्देश मा. पाणीपुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा, महाराष्ट्र राज्य यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्टेम वॉटर डीस्ट्रीब्युशन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कं. प्रा. लि. कंपनीच्या मा. सचिव यांनी अनेक बेकायदेशीर ठराव घेऊन शासनाची दिशाभूल केल्या प्रकरणी आयुक्त ठाणे महानगरपालिका यांनी नोटीस बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदन व आयुक्त ठाणे महानगरपालिका यांनी दिलेल्या नोटीसच्या अनुषंगाने चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, त्याची सद्यस्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०९-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. सदर विषयाची निरंक दिनांकाची तक्रार स्टेम प्राधिकरणाच्या कार्यालयात दि.२६.११.२०२१ रोजी प्राप्त झालेली आहे.

(२) नाही. तथापि, जुलै, २०२१ दरम्यानच्या कालावधीत श्री.भुषण पाटील यांची तक्रार प्राप्त झाली असून, सदर तक्रार पुढील उचित कार्यवाहीसाठी स्टेम प्राधिकरणाकडे पाठविण्यात आलेली असून, त्यावर स्टेम प्राधिकरणामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उदभवत नाही.

---

## तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीमधील प्रदुषणाबाबत

**(४७) ३६२३१ (२९-११-२०२१). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीमध्ये वायुप्रदुषणाची मोजमाप करणाऱ्या प्रणाली प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत विविध ठिकाणी न बसवल्यामुळे तसेच बसवलेली यंत्रणा कार्यान्वित न केल्याने कारखाने वायु थेट हवेत सोडत असल्याने येथील वायुप्रदुषणात वाढ होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राष्ट्रीय हवा गुणवत्ता निरीक्षण कार्यक्रम (NAMP) अंतर्गत तारापूर औद्योगिक वसाहतीच्या परिसरात तीन ठिकाणी हवा निरीक्षण संयंत्रणा कार्यरत आहे. या परिसरातील जानेवारी २०२१ ते ऑक्टोबर २०२१ या कालावधीतील हवा गुणवत्ता अहवालानुसार हवा गुणवत्ता निर्देशांक (Air Quality Index) बहुतेक वेळा उत्तम (Good) व मर्यादेच्या आत (Moderate) असा आढळून आला आहे. तसेच, तारापूर औद्योगिक वसाहतीत सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी संनियंत्रणा (CAAQMS) बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

त्याचप्रमाणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तारापूर औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांची वेळोवेळी पाहणी केली जाते व हवा प्रदुषण करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्यात येते. तसेच सर्वंकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) अतर्गंत तारापूर औद्योगिक वसाहतीचा सर्वसमावेशक कृती आराखडा तयार केला असून, त्याची अंमलबजावणी चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाड (जि.रायगड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४८) ३६४०५ (२९-११-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य श्री.धनाजी शंकर गुरव यांना सन २०१६ मध्ये निलंबित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी महाविद्यालयाचे सन २००२ ते २०१३ या कालावधीतील लेखे तपासले असता जवळपास ८० लाख रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब निदर्शनास आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रक्कम संबंधित दोषी प्राचार्यांकडून अद्याप वसूल करण्यात आली नसल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२०-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, महाड येथील तात्कालिन प्राचार्य डॉ. श्री. धनाजी शंकर गुरव यांना व्यवस्थापनाने सन २०१६ मध्ये निलंबित केलेले नसून त्यांना व्यवस्थापनाचे श्री. एम.एस.मोरे यांनी दि. १६/१२/२०१३ च्या आदेशान्वये निलंबित केले होते. परंतु दुसऱ्या गटाने त्यांचे निलंबन ग्राहय न धरल्याने डॉ. श्री. घनाजी गुरव हे प्राचार्य म्हणून कार्यरत होते.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर महाविद्यालयाच्या सन २००२-२००३ ते २०१२-१३ या कालावधीच्या अनुदान निर्धारणाच्यावेळी वेतन अनुदानाची वसूली रू. ७३,२३,०७४ व वेतनेत्तर वेतनाची वसूली रू. ५,१६,८०५/- अशी एकूण रू. ७८,३९,८७९/- एवढया रक्कमेची वसूली आढळून आली आहे. यापैकी रू. २,३९,८७९/- इतक्या रक्कमेची वसुली करण्यात आली असून, सदर महाविद्यालयाचे विविध बॅकेतील खाती सिल करण्यात आलेली असल्यामुळे शासनास वसूली करण्यास अडचण येत आहे.

(४) भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच संबधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि अस्तित्वात असलेल्या तीनही गटांतील वादामध्ये सामोपचाराने निर्णय होईपर्यन्त जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, रायगड अलिबांग यांनी सदर महाविद्यालयासाठी प्रशासक नेमण्याची शिफारस केली आहे. याअनुषंगाने विद्यापीठ स्तरावरून कार्यवाही सूरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हयातील ८० गावे सामुदायिक पाणी पुरवठा योजनेची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(४९) ३६५१३ (२९-११-२०२१). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठा योजनांची प्रत्यक्ष नागरिकांकडून वसुली केलेली देयकांची रक्कम अद्याप जिल्हा परिषदेला देण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विज देयके न भरल्यामुळे जिल्हयातील ८० गावे सामुदायिक पाणी पुरवठा योजनेचे तब्बल २४ कोटींची थकबाकी असल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामसेवकांकडून ७० टक्के पेक्षा अधिक वसुली केली असतांना अद्याप सदर विज देयके थकीत ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

यावर्षी ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठा योजनांची ग्रामपंचायतने वसुल केलेली रक्कम रु.१७.३२ लक्ष असून जिल्हा परिषदेकडे या वसुली पैकी रु.९.४५ लक्ष इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे.

(२) होय हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत ऑक्टोबर २०२१ अखेर ८० गावे पाणी पुरवठा योजनेवर वीज बिलाची रु.९.९३ कोटी थकबाकी आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

८० गावे पाणी पुरवठा योजना संबंधित ग्रामपंचायतीकडून ७० टक्के पाणीपट्टी वसुली होत नाही. पाणीपट्टी आकारणी एवढी वसुली न झाल्याने वीज देयके थकित राहतात.

(४) वसूल होणाऱ्या पाणीपट्टी वसुलीतून कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, वीजबील, अशुध्द पाणी देयके योजनेची देखभाल व दुरुस्ती, रसायने इत्यादी बाबीवर खर्च होतो. सन २०२१-२२ या वर्षात आतापर्यंत जिल्हा परिषदेने रु.६२.०० लक्ष वीजबिलाचा भरणा केलेला आहे.

---

**पालघर जिल्हयात होत असलेल्या अतिक्रमणाबाबत**

**(५०) ३६५९२ (२९-११-२०२१). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू, घोलवड, वाणगाव, आशागड (जि.पालघर) तसेच सीआरझेड बाधित क्षेत्रात ग्रामपंचायतस्तरावर शेतघर व डहाणू समुद्रकिनाऱ्यालगतच्या चिखले व चिंचणी येथे घर दुरुस्तीच्या परवानग्या घेऊन बांधलेल्या ५० पेक्षा अधिक अनधिकृत बंगल्यांविरुद्ध नोटीस देऊनही कारवाई होत नसल्याने येथील अतिक्रमणात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीआरझेडमधील अनधिकृत बंगल्यांची कोट्यवधींना विक्री करून अतिक्रमण धारकांकडून फसवणुक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांच्या अहवालानुसार ग्रामपंचायतीने अशा प्रकारे अधिकृत बंगल्याना कोणत्याही प्रकारे नोटीस दिली नसून दुरूस्तीच्या परवानग्या दिलेल्या नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतींनी अनाधिकृत बगल्यांवर कोणत्याही प्रकारे कारवाई केलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) डहाणू तालुक्यातील मौजे घोलवड येथील बांधकामाबाबत तक्रारी प्राप्त असून सुनावणीची कार्यवाही सुरू असून सदर प्रकरणी ग्रामपंचायतीकडून घर दुरूस्ती परवानगी दिलेली आहे.सदर प्रकरणात योग्य ती कार्यवाही करण्याची तजवीज ठेवल्याबाबत तहसिलदार डहाणू यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.